# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १०२/२०२०

**विषय : अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांकरिता परीक्षांचे आयोजन करण्याबाबत.**

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ ऑगस्ट, २०२० रोजी दिलेल्या आदेशानुसार, त्यानुषंगाने मा.कुलपती तथा राज्यपाल यांच्या व महाराष्ट्र शासनाने दिनांक ३ सप्टेंबर, २०२० रोजी सुचित केल्याप्रमाणे अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या नियमित व अनुशेषांतर्गत लेखी परीक्षा, तसेच प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प/चर्चासत्रे (Seminar) या परीक्षांच्या आयोजनाबाबत अधिकार मंडळांनी मान्यता दिलेली असून, त्यांचे मार्गदर्शक तत्वानुसार अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे.

१. अंतिम सत्राच्या/अंतिम वर्षाच्या ज्या अभ्यासक्रमांचे प्रात्यक्षिक/मौखिक/प्रकल्प/चर्चासत्र (Seminar) परीक्षा यापूर्वी घेतल्या गेलेल्या नाहीत अथवा झालेल्या नाहीत, त्या सर्व परीक्षांचे आयोजन दिनांक १५ सप्टेंबर, २०२० ते दिनांक २५ सप्टेंबर, २०२० दरम्यान Online पध्दतीने उपलब्ध असलेल्या Google Meet, Microsoft Team, Zoom, WebEx, Telephone इत्यादी विविध पध्दतीने आयोजित करण्यात यावेत. त्यासंबंधीचे संपूर्ण रेकॉर्डींग महाविद्यालयांमध्ये ठेवणे आवश्यक आहे. याबाबतचा अधिकचा तपशील संबंधित महाविद्यालये/संस्थांना त्यांच्या विद्यापीठाच्या अधिकृत मेल आयडीवर पाठविण्यात येईल. सदर परीक्षा संपन्न झाल्यानंतर विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुरक्षित अंतर्गत गुण नोंदणी (Internal Marks Web Portal) या लिंकव्दारे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२० पूर्वी करण्यात यावी.

२. अंतिम सत्रामधील/अंतिम वर्षामधील विद्यार्थ्यांच्या अनुशेषांतर्गत (Backlog) परीक्षांचे संभाव्य वेळापत्रकास मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाने मान्यता दिलेली असून, त्यांचे नियोजन दिनांक १ ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ९ ऑक्टोबर, २०२० दरम्यान Online/offline बहुपर्यायी प्रश्नाव्दारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने करण्यात येईल. त्याबाबतचे स्वतंत्र वेळापत्रक/कार्यपध्दती जाहीर करण्यात येईल.

३. अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील सर्व अभ्यासक्रमांच्या नियमित (Reguler) परीक्षा दिनांक १० ऑक्टोबर, २०२० ते दिनांक ३० ऑक्टोबर, २०२० दरम्यान Online/offline बहुपर्यायी प्रश्नाव्दारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने घेण्यात येतील. त्याबाबतचे स्वतंत्र वेळापत्रक/कार्यपध्दती जाहीर करण्यात येईल.

४. अंतिम सत्रातील/अंतिम वर्षातील परीक्षांसाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांकरिता विद्यापीठाने Online पध्दतीने परीक्षा देणेची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. तथापि offline पध्दतीनेही विद्यार्थ्यांना परीक्षा देता येईल. याबाबत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या लॉगिन आयडीवरुन विकल्प अर्ज (Option Form) उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य तथा परीक्षा अधिकारी/विषय शिक्षक यांना आवाहन करण्यात येते की, सदरची बाब त्यांच्या महाविद्यालय/संस्थेमधील विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याची व्यवस्था करावी व त्यांना यासंदर्भात योग्य ते मार्गदर्शन करावे.

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा-समन्वय/३५५
दिनांक : ०९ सप्टेंबर, २०२०

N.B. TO All students
09/09

प्रत,

१. मा.विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग
२. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/स्वायत्त संस्था, पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा